**४७वी वार्षिक सर्वसाधारण सभा**

अध्यक्षीय...

सन्माननीय सभासद बंधु आणि भगिनींनो...

अपना सहकारी बँकेच्या ४७व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आपणा सर्वांचे मी मन:पूर्वक स्वागत करतो. आपल्या बँकेची ३१ मार्च २०१४ अखेरची वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेली आर्थिक पत्रके व संचालक मंडळाचा अहवाल आपणास मिळाला असेल आणि आपण त्याचे अवलोकन केले असेलच.

सर्वप्रथम नुकत्याच झालेल्या अपना बँकेच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक (सन २०१४ ते २०१९) निवडणुकीत **माझ्या नेतृत्वाखाली उभ्या राहीलेल्या पॅनलच्या सर्वच्या सर्व उमेदवारांना आपण भरघोस मतांनी निवडून दिल्याबद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहे.** या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे सुमारे १५००० सभासदांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. **सहकार चळवळीबद्दल एक प्रकारची जागरूकता या निमित्ताने आढळून आली.** पर्यायाने बँकसुध्दा लोकाभिमुख होत असल्याचे दिसून आले. आमचा हा विजय म्हणजे अपना बँकेच्या प्रगतीसाठी घेतलेल्या प्रामाणिक परिश्रमाचा, सत्याचा आणि आपणा सर्वांच्या विश्वासाचा विजय आहे असे मी मानतो. आपण दाखविलेला विश्वास आम्ही भविष्यातील योजलेल्या योजना यशस्वी करून सार्थ ठरवू अशी मी माझ्या सहकारी संचालकांच्या वतीने आपणाला ग्वाही देतो.

बंधु-भगिनिंनो, मागील दहा वर्षातील अपना बँकेच्या कारभाराकडे पहात असताना प्रगतीची अनेक शिखरे प्रतिकूल परिस्थितीत गाठता आली याचे मला समाधान आहे. **आपण सारेजण या यशामध्ये माझ्या सोबत आहात याचा मला अतिशय आनंद आहे.** तत्कालीन परिवार प्रमुख आदरणीय सहदेव फाटक व अपना परिवाराने सन २००३ च्या ऑगस्ट महिन्यात अपना बँकेच्या अध्यक्षपदाची धुरा माझ्याकडे सोपविली होती. त्यांनी माझ्यावर सोपवलेली जबाबदारी कर्तव्यभावनेतून, कष्टाने आणि निष्ठेने मी माझ्या सहकारी संचालकांच्या मदतीने पार पाडत आहे. **आमची श्रध्दास्थाने एस.एम.जोशी, नानासाहेब गोरे आणि प्रा.मधु दंडवते यांच्या समाजवादी विचारांची प्रेरणा घेऊन आणि सामाजिक बांधिलकीचा विचार मनात ठेवून संचालक मंडळ वाटचाल करीत आहे.** आत्मविश्वास, सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची क्षमता, कर्तव्यभावना, परिश्रम आणि बँकेचा अधिकारी वर्ग आणि कर्मचारी यांची मेहनत व सहकार्य यांच्या बळावर अपना बँकेने आजवरचा प्रवास यशस्वीरित्या पार पाडला आहे. भविष्यातील प्रगतीचा फार मोठा पल्ला या सर्वांच्या सहकार्याने आम्ही गाठू शकू असा मला विश्वास आहे.

सन २०१३-१४ हे आर्थिक वर्ष अर्थव्यस्थेला आणि विशेषत: बँकिंग क्षेत्राला आव्हानात्मक ठरले. आर्थिक वर्षाच्या सुरवातीस आंतरराष्ट्रीय व देशातील अर्थव्यवस्थेची स्थिती चिंताजनक राहिली. मागील काही वर्षापासून जागतीक अर्थव्यवस्था मंदीत आहे. परिणामी अमेरिका, इंग्लड, जपान आणि युरोपीय देश यांचा विकास दर अपेक्षेप्रमाणे वाढला नाही. आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या रोखे पुनर्खरेदी धोरणामुळे मोठ्या प्रमाणावर परकीय गंगाजळी भारताबाहेर गेली. यामुळे भारतीय रुपयांचे अवमूल्यन होऊन चालु खात्यातील तूट प्रचंड प्रमाणात वाढली. रूपयांची घसरण थांबविण्यासाठी रिझर्व्ह बँकेने विविध परिणामकारक उपाययोजना केल्या व सदर तूट आटोक्यात आणली. परिणामत: अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रूपयाचा विनिमय दर रु. ६८.८० प्रति डॉलर वरून ३१ मार्च २०१४ रोजी रु. ५९.८१ प्रती डॉलर इतका सशक्त झाला. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात घरगुती व जागतीक स्तरावरील अनेक घटकांमुळे, वाढती महागाई, औद्योगिक वाढीचा नकारात्मक वेग इत्यादी कारणामुळे आर्थिक वाढीचा दर ५ टक्के पेक्षा कमी राहीला. शिवाय अनुत्पादीत कर्जे व कर्जाच्या तरतुदीमध्ये झालेल्या वाढीमुळे शेती, औद्योगिक इ. क्षेत्रातील मंदीमुळे आर्थिक प्रगतीवर परिणाम होऊन बँकांच्या नफ्यामध्ये अपेक्षीत वाढ झाली नाही.

अहवाल वर्षात मार्च २०१४ अखेर बँकेने **एकूण व्यवसायाचा रु.३६०० कोटीचा टप्पा पार केला आहे**. बँकेच्या एकूण उलाढालीत रु.५६६.४५ कोटीची वाढ झाली. बँकेच्या ठेवी व कर्जातील ही वाढ ऐतिहासीक आहे. **आजमितीस बँकेच्या एकूण व्यवसायाचा रु.३८६५ कोटीचा टप्पा पार झाला आहे.** एप्रिल २०१४ पासून सप्टेंबर २०१४ अखेर एकूण व्यवसायात रु.२५०कोटीची वाढ झाली आहे. खरं म्हणजे पहिल्या सहामाहीत व्यवसाय वाढीचा वेग मंदावलेला असतो असा आजवरचा अनुभव आहे. परंतु या वर्षी मार्च नंतर हा वेग वाढला आहे. यावरून बँकेच्या प्रगतीवर ग्राहकांचा दिवसेंदिवस वाढता विश्वास दर्शवीतो. अहवालसालात **एकूण व्यवसायात १८.५८ टक्के वाढ झाली** आहे. कठीण आर्थिक परिस्थिती व महागाईचा उच्चांक यावर मात करीत **बँकेने ठेवीवृध्दीचा वेग १५.२० टक्के राखला आहे.** ठेवीवाढीसाठी बँकेने ११.१२.१३ ही विशेष ठेव योजना जाहीर केली. त्यासाठी खास प्रसिध्दी करून ग्राहकांना ठेव ठेवण्याचे आव्हान केले होते. या योजनेस उदंड प्रतिसाद मिळून एका दिवसात रु.५५ कोटीची वाढ ठेवीमध्ये झाली. मार्च २०१४ अखेर बँकेच्या **ठेवी रु.२१४४ कोटी १५ लाख झाल्या.** आर्थिक मंदिमुळे आणि देशात निवडणूकीचे वारे वाहू लागल्यामुळे नविन उद्योग सुरू करण्यास कोणीही धजावत नव्हते. परिणामी बँकांच्या कर्जास उठाव नव्हता. नविन कर्जदारांना आकर्षीत करण्यासाठी बँकेने कर्जाच्या विविध सवलती जाहीर केल्या. बँकेने कोल्हापूर, सांगली, म्हापसा (गोवा), पुणे इत्यादी नविन उघडलेल्या शाखांमधून कर्जास चांगल्या प्रकारे आलेली मागणी कर्जात वाढ होण्यास पूरक ठरली. रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार घर तारण, सोने तारण, मार्गेज लोन इत्यादि कर्ज वाटपावर भर देऊन कर्ज मंजूरीचे धोरण अधिक सुटसूटीत व सकारात्मक करून कर्ज वाढीवर भर दिला. परिणामी **मार्च २०१४ अखेर कर्जात २३.८८ टक्के वाढ झाली** व गतवर्षीच्या तुलनेत त्यात **रु.२८३.६० कोटीची भर** पडली. सिडी रेशो व्यवस्थापन हा एक जिकीराचा भाग असतो परंतु संचालक मंडळाच्या दूरदर्षी धोरणामुळे रिझर्व्ह बँकेच्या मापदंडानुसार बँकेच्या सर्वांगिण प्रगतीतही आपण सिडी रेशो व्यवस्थापनात यशस्वी झालेलो आहोत. अहवाल वर्षात **सिडी रेशो ६८.६० टक्के राखण्यात यश मिळाले आहे** हे नमूद करण्यास मला समाधान वाटते.

बँकेवरील आपल्या सर्वांचा विश्वास भाग भांडवलाद्वारे प्रदर्शित होत असतो. भाग भांडवलात सातत्याने होणारी वाढ हा विश्वास दर्शविते. अहवालसाली **भाग भांडवलात रु.१८ कोटीची ऐतिहासीक वाढ झाली** आहे. मार्च २०१४ अखेर **भागभांडवल रु.९२ कोटी १० लाख झाले** आहे. भांडवल पर्याप्तता राखणे हे कोणत्याही सहकारी बँकेचे सक्षमपणाचे लक्षण मानले जाते. रिझर्व्ह बँकेने आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानूसार भांडवल पर्याप्तता ९ टक्के असणे आवश्यक आहे. बँकेच्या आजवरच्या इतिहासात **भांडवल पर्याप्तता ९ टक्क्याहून अधिक राखण्यात नेहमीच आपल्याला यश मिळाले आहे.** अहवाल वर्षातही बँकेने **भांडवल पर्याप्तता १४.४० टक्के** इतकी राखली आहे. नेट वर्थ म्हणजेच बँकेचे नक्त मुल्य यावरून बँकेच्या विकासाच्या व प्रगतीच्या दिशा ठरतात. **बँकेचा मार्च २०१४ अखेर नेट वर्थ रु.२०८ कोटी ५५ लाख झाले आहे.** बँकेचा स्वनिधी हे बँकेच्या सक्षमतेचे व आर्थिक स्थैर्याचे द्योतक आहे. अहवाल वर्षात बँकेचा **स्वनिधी रु. २७४.७० कोटी** झालेला आहे. खेळत्या भांडवलात बँकेने चढता आलेख कायम राखला आहे. मार्च २०१४ अखेर **खेळते भांडवल रु.२४१५.२५ कोटी** झालेले आहे. गुंतवणूकीकडे संचालक मंडळ विशेष लक्ष देत असते. ठेवी व कर्जातील वाढीची सुयोग्य हाताळणी केल्यानंतर अतिरिक्त निधीची गुंतवणूक केल्याने बँकेच्या नफ्यात वाढ होते. या निधीची चांगल्याप्रकारे गुंतवणूक करण्यात व परिणाम नफा क्षमता वाढवण्यात बँक यशस्वी ठरलेली आहे. बँकिंग नियंत्रण कायदा १९४९च्या कलम १८ व २४ मधील तरतुदी व रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार **एकूण गुंतवणूक रु.७८० कोटी २९ लाखाची झाली आहे**. आंतरराष्ट्रीय पातळीवर चालू खात्यातील तूट ही देशाच्या मंदावलेल्या आर्थिक विकासास कारणीभूत ठरत असताना व त्याचे परिणाम सर्वच बँकिंग व्यवसायावर होत असताना बँकेच्या नफ्यावर परिणाम होऊन त्यात म्हणावी तशी वाढ होवू शकली नाही. तरिही बँकेने अहवाल वर्षात **रु.२५.९७ कोटीचा ढोबळ नफा** कमावला व सर्व आवश्यक त्या तरतूदी करून **रु.१९ कोटी ४१ लाखाचा नक्त नफा मिळविला** आहे. उपरोक्त सर्वांगिण आर्थिक प्रगतीमुळे संचालक मंडळाने अहवाल वर्षाकरीता **सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याची परंपरा कायम राखली आहे.**

बँकेने आजवर तीन आजारी बँकांचे आपल्यात विलीनीकरण करून घेतले. तेथील ठेवी व कर्जाबरोबरच या विलीनीकरणात बँकेने तेथील वसुल न होणाऱ्या कर्जाची रक्कमही सामाऊन घेतली होती. रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार **आता ७ टक्केच्या खाली ढोबळ एनपीए असलेल्या सहकारी बँकांना सुदृढ आणि आर्थिक सक्षम बँक म्हणावे अशी नव्याने व्याख्या करण्यात आली आहे.** संचालक मंडळाने सुयोग्य वसुलीचे नियंत्रण ठेवत व विशेषत: आजारी बँकांच्या एनपीएवर घेतलेली मेहनत यामुळे **ढोबळ एनपीएचे प्रमाण ४.३२ टक्के आणण्यात महत्त्वाचे यश प्राप्त केले आहे** हे समाधानाने नमूद करावेसे वाटते. उपरोक्त आर्थिक प्रगतीच्या पार्श्वभूमीवर मार्च २०१४ अखेरील ताळेबंद व नफा तोटा पत्रके गृहीत धरून रिझर्व्ह बँकेने अपना बँकेचे लेखापरिक्षण केले. आपणास सांगताना आनंद होतो की, या लेखापरिक्षणात अपना बँक ही आर्थिक सक्षम बँक असल्याचा निर्विवाद निर्वाळा रिझर्व्ह बँकेच्या लेखापरिक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांनी दिला. ही बाब आपणा सर्वांना गौरवास्पद आहे असे मला वाटते. वैधानिक लेखापरिक्षणातही बँकेस सातत्याने ''अ'' ऑडिट वर्ग प्राप्त झाला आहे. अहवाल वर्षातही बँकेस वैधानिक लेखापरिक्षकांनी **आपल्या बँकेस "अ" ऑडिट वर्ग** दिला आहे.

बँकेची सर्वांगिण प्रगती पाहता बँकेच्या हिताच्या दृष्टीने व प्रगतीचा वेग असाच कायम राखण्याच्या दृष्टीने उपविधीमध्ये काही बदल करणे क्रमप्राप्त आहे. अधिकृत भाग भांडवलाची मर्यात आजवर रु.१०० कोटी आहे हे आपण जाणताच. परंतु भाग भांडवल वाढीचा वेग लक्षात घेता उपविधीच्या पोटनियम क्रमांक १३ मध्ये बदल करून भाग भांडवलाची मर्यादा रु.३०० कोटीपर्यंत करावी असे संचालक मंडळाने ठरविले आहे आणि त्यानुसार उपविधीमध्ये बदल करावे अशी शिफारस केलेली आहे. तसेच सध्या आपणास पोस्टाद्वारे वार्षिक अहवाल प्राप्त होत आहेत. ते वेळेत प्राप्त व्हावे यासाठी बँकेची प्रशासकीय यंत्रणा अहोरात्र मेहनत घेत असते. हरित क्रांतीच्या माध्यमातून कागदविरहीत कामकाज करण्याचे सरकारचे धोरण आहे. बँक संगणकीकृत झाल्यापासून आपणही हे धोरण अवलंबिले आहे. त्यासाठी सभासद व ग्राहक यांना वेळेत सूचना मिळाव्यात म्हणून ई-मेल व एसएमएस या यंत्रणेचा प्रभावी वापर आपण सुरू केला आहे. याचाच पुढील टप्पा म्हणून येत्या आर्थिक वर्षापासून अहवालाची प्रत इलेक्ट्रॉनिक माध्यमातून आपणास त्वरित पोहोचवण्यात येईल. बँकेच्या अधिकृत संकेत स्थळावर ही प्रत उपलब्ध करून दिली जाईल व ती डाऊन लोड करून आपणास अभ्यासता येईल. याशिवाय बँकेच्या सर्व शाखांमध्ये या अहवालाची प्रिंटेड प्रत सभासदांना उपलब्ध करून दिली जाईल. तसेच कोणत्याही सभासदाने लेखी स्वरूपात मागणी केल्यास अहवालाची प्रत पोस्टाद्वारे त्याच्या पत्यावर पाठवण्यात येईल. यामुळे बँकेच्या खर्चात बचत तर होईलच शिवाय सरकारच्या धोरणाचा पुरस्कार करून आपण हरित क्रांतीस (Green Revolution) प्रोत्साहन देत असल्याचे सामाजिक कार्य आपल्या हातून घडेल. उपविधीतील बदल करण्याच्या या सूचनेस आपण संमती द्याल अशी खात्री आहे. यापूर्वी बँकेच्या संचालक मंडळावर अधिकृत युनियनचे दोन प्रतिनिधी आपण स्विकृत करीत होतो. बँकेस बहुराज्यीय दर्जा मिळाल्यामुळे युनियनचे प्रतिनिधी घेण्याचा उपविधीतील बदल नव्याने ठराव मांडून करणे प्राप्त आहे. आमचे वैचारिक अधिष्ठान असलेले एस.एम.जोशी हे थोर कामगार नेते होते. त्यांचे कामगार क्षेत्रातील कार्य व कामगारांबद्दल असलेली त्यांची कर्तव्य भावना ही श्रमाला श्रेष्ठत्व मिळवून देणारी होती याचे या प्रसंगी मला स्मरण होते. प्रशासन व कर्मचारी यांची एकमेकाप्रती पूरक अशी आदराची व सहकार्याची भावना संस्थेसाठी, तिच्या उत्कर्षासाठी आणि कर्मचाऱ्यांच्या भल्यासाठी गरजेची असते असा संचालक मंडळाचा विश्वास आहे. त्यामुळे याही ठरावास आपण मंजूरी द्यावी अशी मी आपणास विनंती करीत आहे.

अहवाल वर्षात बँकेने पुणे, म्हापसा (गोवा) तसेच उरण येथे शाखा सुरू केल्या. या शाखा आपापल्या ठिकाणी उत्तम व्यवसाय करीत आहेत. सन २०१३-१४ या वर्षात नविन शाखांसाठी रिझर्व्ह बँकेकडे संचालक मंडळाने प्रस्ताव पाठविला होता. त्यास प्रतिसाद मिळून बँकेस घोडबंदर (ठाणे), दिवा, नवी मुंबई, दहिसर व विरार येथे शाखा उघडण्याची परवानगी मिळाली असून येथे शाखा उघडण्याचे काम अंतिम टप्प्यात

आले आहे. **लवकरच बँकेच्या या ५ शाखा कार्यान्वित होतील.** याबरोबरच बँकेने सन २०१४-१५ या कालावधीसाठी गोरेगांव, चेंबूर, मुलुंड, घाटकोपर, कोपर खैराणे, ऐरोली, उल्हास नगर या ठिकाणीही शाखा उघडण्याचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेकडे पाठविला आहे. त्यास लवकरच परवानगी मिळेल अशी आशा आहे.

**पारंपारीक बँकिंग सेवा सुविधांबरोबरच बँक अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारीत सेवा सुविधा पुरवित आहे.** जीवन विमा व सर्व साधारण विमा यासाठी बँकेने एलआयसी व बजाज अलायन्झची कार्पोरेट एजन्सी घेतली आहे. या व्यवसायास बँकेस ग्राहकांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. ही बाब लक्षात घेऊन **बँकेने दादर (प) येथे स्वतंत्र विभागाची स्थापना केली आहे.** याबरोबरच परकीय विनिमय व्यवहार या सुविधेसाठी सर्व शाखांतून ग्राहकांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. यासाठीही स्वतंत्र फोरॅक्स विभागाची स्थापना करण्यात येणार आहे. हा व्यवसाय वाढविण्यासाठी आवश्यक असलेला विदेशी चलन व्यवसाय परवाना (AD-II) ऑथोराईज्ड डिलरशीप मिळण्यासाठी बँक प्रयत्नशील होती. आपणास कळविण्यास आनंद होतो की, **आपल्या बँकेस (AD-II) हा परवाना मिळाला आहे.** बँकेला तीन वर्षापूर्वी ISO-27001 हे तंत्रज्ञान सुरक्षा प्रमाणपत्र प्राप्त झाले होते. या प्रमाणपत्राचे अहवाल वर्षात यशस्वी नूतनीकरण करून घेण्यात आले. बँकेच्या **नायगाव शाखेत "मेगा बँकर" ही सुविधा सुरू केली.** यामुळे ग्राहकांना एकाचवेळी रक्कम काढणे, चेक भरणे, पासबुक प्रिंटींग व खाते उतारा मिळण्याची सोय झाली आहे. अपना बँक ही अशी सुविधा देणारी पहिलीच सहकारी बँक आहे. अपना बँकेने एटीएम कार्ड सुविधा यापूर्वीच सुरू केली आहे. **अहवाल वर्षात नॅशनल पेमेंट ऑफ इंडियाच्या सहकार्याने ''रुपे डेबीट कार्ड'' सुविधा सुरु केली.** यामुळे ग्राहकांना एटीएम सुविधेबरोबरच मार्केटमध्ये खरेदी करण्यासही ही सूविधा उपयोगी पडेल. या बरोबरच **बँकेने थेट आरटीजीएस/एनईएफटी या सुविधासुध्दा ग्राहकांना उपलब्ध करून दिल्या आहेत.**

बँकेने सन २०१५ साठी रु.५००० कोटी एकूण व्यवसायाचे उद्दिष्ट ठरविले आहे. आजमितीस बँकेच्या व्यवसाय वाढीचा वेग लक्षात घेता हे उद्दिष्ट साध्य होईल अशी आशा आहे. यासाठी संचालक मंडळाने नियोजनबध्द आराखडा करून त्याप्रमाणे वाटचाल करण्याचे ठरविले आहे.

सन २०१४-१५ हे आर्थिक वर्ष बँकिंगसाठी फायद्याचे ठरण्याची चिन्हे आहेत. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर आर्थिक मंदीचे परिणाम हळूहळू कमी होत आहेत व अर्थव्यवस्था स्थिरावत आहे. देशात बऱ्याच वर्षांनी स्थिर सरकार आले आहे. अर्थव्यवस्थेच्या निकोप वाढीसाठी हे फायदेशीर ठरण्याची शक्यता आहे. परिणामी बँकिंग क्षेत्राला अधिक उभारी मिळण्यास वाव आहे. या पार्श्वभूमीवर अपना सहकारी बँकेची प्रगती अधिक जोमाने करण्याचा संचालक मंडळाचा मनोदय आहे. माझ्यावर विश्वास टाकून आजवर आपण जो पाठिंबा दिला आहे तसाच पाठिंबा आपण सदैव मला व संचालक मंडळाला द्याल अशी खात्री आहे. संचालक मंडळाच्या वतीने मी सर्व सन्माननीय सभासद, ग्राहक, अधिकारी, कर्मचारी व हितचिंतक यांचे मनापासून आभार मानतो.